Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 18 January 2025
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १८ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्ड वितरणाला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ होत आहे. या कार्यक्रमात देशभरातल्या दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतल्या ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहेत. जमीन मालकाला त्याच्या जमिनीची कायदेशीर सनद मिळवून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.
छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच प्रत्येक तालुका मुख्यालयात हा कार्यक्रम पाहण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. जिल्ह्यात ९२५ गावांपैकी ७२७ गावांमध्ये या योजनेअंतर्गत मालमत्तांची मोजणी पूर्ण झाली असून, एक लाख १३ हजार प्रॉपर्टी कार्डसचं वितरणही करण्यात आलं आहे.

****

पर्यटन विभागाने पर्यटन धोरण २०२४ ची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी त्याचप्रमाणे पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांचं बळकटीकरण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. पर्यटन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना काल ते बोलत होते.
केरळच्या धर्तीवर राज्यातही वैद्यकीय पर्यटनासाठी पर्यटन विकास करून राज्यातील आयकॉनिक पर्यटनस्थळांचा विकास करण्यावर विभागाने भर द्यावा, शिवसृष्टी ऐतिहासिक थीम पार्क उभारणं, सभा मंडप आणि स्कायवॉक पंढरपूर ही कामं प्राधान्यानं करावीत आदी सूचनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिल्या.

****

शेतीसाठीच्या पाण्याची तूट वाढत असल्यामुळं शहरांनी आता पाण्याचं संवर्धन आणि शुद्धीकरण करून पाणी वापरणं आवश्यक आहे; त्यातून ४० टक्के जमीन

सिंचनाखाली येऊ शकते, असं प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल पुण्यात केलं. नदी जोड प्रकल्पाबाबत यशदा इथं आयिजित कार्यशाळेनंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

****

राज्य शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना तसंच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा "शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार" प्रदान करण्यात येतो. २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरस्काराकरिता अर्ज करण्याचं आवाहन क्रीडा विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम आणि दिव्यांग खेळाडूंनी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकवर येत्या २६ जानेवारीपर्यंत केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचं आवाहन क्रीडा विभागाने केलं आहे.

****

गरीब तसंच गरजू व्यक्तींना राज्य शासनाच्या वतीने सवलतीच्या दरात शिवभोजान थाळी उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेसाठी डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीकरिता ५० कोटी, ८२ लाख १२ हजार रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला असून याबाबतचा शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने काल निर्गमित केला.

****

कोल्हापूर मधल्या श्री अंबाबाई मंदिर परिसरातील गरुड मंडप, मणिकर्णिका कुंड आणि नगारखान्याची कामं जलद गतीने पूर्ण करावीत. तसंच या कामांच्या दर्जात कोणतीही हयगय होता कामा नये, असे निर्देश कोल्हापूरचे जिल्हाधिकारी तथा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल येडगे यांनी दिले आहेत. अंबाबाई मंदिर परिसरातील नूतनीकरण कामांबाबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

****

लातूर इथं जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय आणि जिल्हा पशुचिकित्सालयात काल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी यामध्ये सहभाग घेतला.

या उपक्रमादरम्यान परिसर स्वच्छता, कचऱ्याचं व्यवस्थापन, झाडांची छाटणी, तसंच कार्यस्थळ स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महागामीच्या वतीनं आयोजित शार्ङ्गदेव महोत्सवात आज सकाळच्या सत्रात बंगळुरूचे अर्जुन भारद्वाज यांचं भारतीय आणि ग्रीको-रोमन नाटक, भुवनेश्वरच्या पद्मश्री इलियाना सितारिस्टी यांचं योद्ध्यांचं नृत्य, आणि बडोद्याच्या अरुपा लाहिरी यांचं इतर कथांचा मागोवा: स्मृती आणि इतिहास यावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झालं, तर सायंकाळच्या सत्रात, सुखद मुंडे आणि समुहाचं पखावज वादन, प्रसिद्ध गायक भुवनेश कोमकली यांचं ख्याल गायन, आणि पार्वती दत्ता यांचं कथक नृत्यप्रकारात घरघरिका याबाबत सादरीकरण होणार आहे.

****

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधुचा इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस् टुनजुंग हिनं पराभव केल्यामुळं तिचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

****